1 Aug 2011 Sakal.




कृष्णसुंदर गार्डन : 'सकाळ माध्यम समूह' आणि 'मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड'तर्फे डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते यशस्वी उद्योजिकांना 'महाराष्ट्र उद्योगिनी पुरस्कार' रविवारी प्रदान करण्यात आला. या वेळी (डावीकडून) मनीषा पाटील, नीता पुरी, रेखा बोरकर, डॉ. प्रदीप बावडेकर, जाधव, माधव गोखले, अंजली चुरी, रेखा चौधरी, प्रतिभा भांबुरकर.

1 Aug 2011 Sakal

# उद्योगांकडे डोळसपणे पाहा

## केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांचे आवाहन

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ३१ : "स्पर्धात्मक गुणवत्ता हा भविष्यातील युगाचा धर्म आहे. त्यामुळे आपली तांत्रिक क्षमता वाढवून भविष्यातील उद्योगांच्या बदलांकडे डोळसपणे पाहून निर्णय घेतला तर देशाच्या प्रगतीमध्ये उद्योजिका आपले योगदान देऊ शकतील," असा विश्वास केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी रविवारी व्यक्त केला.

'सकाळ माध्यम समूह' आणि 'मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड'तर्फे आयोजित कार्यक्रमात यशस्वी महिला उद्योजिकांना जाधव यांच्या हस्ते 'महाराष्ट्र उद्योगिनी पुरस्कार' प्रदान करण्यात आले. 'मिटकॉन'चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. प्रदीप बावडेकर, 'सकाळ'चे वृत्तसंपादक माधव गोखले, 'केसरी टूर्स अँड ट्रॅव्हल्स'च्या झेलम चौबळ, 'पु. ना. गाडगीळ अँड कंपनी'चे पराग गाडगीळ, 'सह्याद्री फूट वेअर'चे गोपाळ माने, 'अथर्व आयुर्वेदिक फार्मास्युटिकल्स'चे डॉ. सुकुमार सरदेशमुख, 'सरपोतदार केटरर्स'चे किशोर सरपोतदार, 'कुतवळ फूड्स'च्या सुवर्णा कुतवळ, 'लोटस खाकरा-शबरी खाकरा'च्या मनीषा दुगड, 'गॉडगिफ्ट प्रॉपर्टीज'चे कल्पेश दुगड, स्पर्धेचे परीक्षक धनंजय दातार आणि विवेक वेलणकर याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते. 'महाराष्ट्र उद्योगिनीज् रेकॉर्ड बुक' या पुस्तिकेचे प्रकाशन या वेळी जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

जाधव म्हणाले, "आर्थिक नीतीचे सुकाणू बदलल्यानंतर गेल्या दोन दशकांमध्ये देशाची प्रगती झपाट्याने झाली. नियंत्रणाच्या जाळ्यात जखडलेली उद्योजकता मोकळी झाल्याने विकास दरामध्ये २५ वर्षांत साडेतीन टक्क्यांपासून ते नऊ टक्क्यांपर्यंत वाढ झाली. आपल्या अर्थव्यवस्थेने जी प्रतिकारशक्ती मिळविली त्याचा हा परिपाक असून त्यामध्ये उद्योजिकांचा महत्त्वाचा वाटा आहे. आगामी काळात दहा टक्के विकास दराचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने १२ व्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. गतिमान, सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाबरोबरच नव्याने रोजगार निर्मितीचा उद्देश साध्य करावयाचा आहे. त्यामुळे भविष्यात भरभराटीला येणाऱ्या उद्योगांचा वेध घेऊन बदलांकडे डोळसपणे पाहणारे उद्योजक हेच स्पर्धात्मक गुणवत्तेमध्ये टिकणार आहेत."

शहर स्तरावर पंचतारांकित हॉटेल्सना भाज्या आणि फळे पुरविण्याचा व्यवसाय करणाऱ्या मुंबईच्या अंजली चुरी तर, ग्रामीण स्तरावर बुलडाणा येथील कशिदाकाम करणाऱ्या रेखा बोरकर यांना सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. शहर स्तरावर पुण्यातील वारजे येथील पेंट मॅन्युफॅक्चरर प्रतिभा भांबुरकर आणि नवी मुंबईच्या स्पा एक्स्पर्ट रेखा चौधरी, तर ग्रामीण स्तरावर सांगली येथील सेंद्रिय खतनिर्मिती करणाऱ्या मनीषा पाटील आणि अमरावतीच्या अंजनगाव दर्जी येथील दाल पुरीचा व्यवसाय करणाऱ्या नीता पुरी या रौप्यपदकाच्या मानकरी ठरल्या. या वेळी बावडेकर आणि दातार यांनी मनोगत व्यक्त केले. धनश्री लेले यांनी सूत्रसंचालन केले.

### 'अष्टरूपा'तून विणला स्त्रीरूपांचा गोफ

पुरस्कार वितरण कार्यक्रमानंतर 'अष्टरूपा' या नृत्यात्मक कार्यक्रमातून विद्येची देवता सरस्वती, छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या जिजामाता, झाशीची राणी लक्ष्मीबाई अशा स्त्रीरूपांचा गोफ विणला गेला. यामध्ये अभिनेत्री भार्गवी चिरमुले, मृणाल दुसानिस, नेहा जोशी यांचा सहभाग होता. कार्यक्रमाची संकल्पना नेहा नगरकर यांची, संहितालेखन आणि सूत्रसंचालन धनश्री लेले यांचे, तर नृत्यदिग्दर्शन कीर्ती भवाळकर यांचे होते.